**एच.एम.पी.क. १९७/२०१२**

श्रीमती विनया विजय सागवेकर ...अर्जदार

वि.

श्री.विजय दत्तात्रेय सागवेकर ... सामनेवाला

## :: आदेश निशाणी १५ वर ::

प्रस्तुत अर्ज हा लेखी म्हणण्याशिवाय प्रस्तुत प्रकरण चालवण्यिात यावे हा आदेश रद्द करण्याकरिता देण्यात आला आहे.

२. अर्जातील तथ्य कथनाचे अवलोकन केले. प्रतिपक्षाचे बाजूने त्यावर लेखी म्हणणे दाखल करण्यात आले नाही. प्रस्तुत प्रकरणात सामनेवाला हा दि.२१/०१/२०१३ रोजी हजर झाला व त्यास प्रस्तुत प्रकरणाची लेखी सूचना दि.०५/०१/२०१३ रोजी प्राप्त झाली होती. प्रस्तुत अर्ज हा त्याने दि.२८/०६/२०१६ रोजी दाखल केला आहे. सदर सामनेवाला याने जरी प्रस्तुत अर्ज हा दि.२८/०६/२०१६ रोजी अतिदिर्घ विलंबाने दाखल केला असला तरीही अभिलेखावर दाखल असलेल्या दस्तऐवजावरुन असे दिसून येते की, दि.१४/०८/२०१३ रोजी निशाणी ११ वर त्याने प्रस्तुत प्रकरणात लेखी म्हणणे दाखल केले होते. परंतू सदर लेखी म्हणण्यासोबत लेखी म्हणणे दाखल करण्यास झालेला विलंब माफ होऊन मिळण्याची विनंती अर्जात नमूद केली नव्हती. म्हणून माझे सन्माननीय पुर्वाधिकारी यांनी सदर लेखी म्हणणे अभिलेखावर घेतले नाही. सदर परिस्थिती विचारात घेता दि.१४/०८/२०१३ रोजीचे सामनेवाला याने लेखी म्हणणे प्रस्तुत प्रकरणात दाखल केले होते असे दिसून येते. म्हणून त्याच्या बाजूने झालेला विलंब हेतुपुरस्सर दिसून येत नाही. सबब, सदर अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. म्हणून, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे.

## :: आदेश ::

१. प्रस्तुत अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

२. सामनेवाला याच्याविरुध्द प्रस्तुत प्रकरण विना लेखी म्हणणे चालविण्याचा आदेश रद्द करण्यात येतो.

३. सदर अर्जाचा खर्च रक्कम रु.३०००/- सामनेवाला याने न्यायालयात जमा करावा.

सही/-
(राजेश क. खोमणे)
सह दिवाणी न्यायाधीश, व.स्तर, पनवेल.

पनवेल.
दिनांक ०३/०३/२०१७.